पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- १५/१०/२०१९*

## गडचिरोली पोलीस दलाने दिव्यांगाना दिला माणुसकीचा आधार

गडचिरोली पोलीस दल आपल्या कर्तव्यासोबतच सामाजिक कार्याची जाण ठेवुन जनसामान्य नागरिकांच्या मदतीसाठी सदैव तत्पर असते. यासाठी गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने विविध उपक्रम राबविले जातात. याचाच एक भाग म्हणुन उपपोस्टे देचलीपेठाचे प्रभारी अधिकारी सपोनी महादेव शेलार हे देचलीपेठा हद्दीतील सर्वसामान्य व आदिवासी नागरिकांचे जीवनमान सुधारण्यासाठी नाविण्यपुर्ण उपक्रम राबवित आहेत.

उपपोस्टे देचलीपेठा हद्दीतील मौजा सिंधा हे गाव  नक्षलदृष्टया अतिसंवेदनशिल व दुर्गम आहे. या गावातील रहिवासी श्री विनोद मडावी वय ३५ वर्ष व सतिश मडावी वय ३० वर्ष हे दोन्ही भाऊ पायाने दिव्यांग आहेत. त्यांना चालता फिरता येत नाही. त्यामुळे ते उदरनिर्वाहाचे कोणतेही काम करु शकत नाही. त्या दोन्ही मुलांचा सांभाळ त्यांचे वडील करीत होते परंतु कर्करोगाच्या (कॅन्सर) आजारामुळे त्यांचे मागील महिन्यात वयाच्या ५५ व्या वर्षी निधन झाले.

विनोद व सतिश हे दोन्ही भाऊ आपल्या आईसोबत झोपडीमध्ये राहत असुन, त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची व अत्यंत कष्टप्रद आहे. ही बाब देचलीपेठाचे प्रभारी अधिकारी सपोनी महादेव शेलार यांच्या लक्षात येताच त्यांनी सतिश व विनोद या दोन्ही दिव्यांगाची भेट घेतली व  शेलार यांनी ''आधार फॉऊंडेशन'' या पोलीस अधिकाऱ्यांच्या व्हाटस्अप ग्रुपला संपर्क करुन विनोद मडावी व सतिश मडावी यांचेकरीता ''व्हिलचेअर'' उपलब्ध करुन दिली. सदर व्हिलचेअर मा. उपविभागिय पोलीस अधिकारी श्री राहुल गायकवाड जिमलगट्टा यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक-१४/१०/२०१९ रोजी विनोद मडावी यांना भेट देण्यात आली असुन याप्रसंगी बीएसएफचे असिस्टंट कमांडंट श्री संजीवकुमार, सपोनि. महादेव शेलार पोउपनि. अनिल भुसारे, पोउपनि. उपरे व पोलीस कर्मचारी उपपोस्टे देचलीपेठा तसेच सिंधा गावचे ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. सदर व्हिलचेअरमुळे विनोद व सतिश यांना त्यांचे राहते घरी छोटेसे किराणा दुकान चालविणे सोयीचे होईल व ते आपल्या वयोवृध्द आईसह स्वत:चा उदरनिर्वाह करु शकतील.

उपपोस्टे देचलीपेठा येथील प्रभारी अधिकारी सपोनि महादेव शेलार सा़े. व त्यांच्या टीमच्या विविध नाविण्यपुर्ण उपक्रमाची गावकरी प्रशंसा करीत आहेत.


Shot on vivo S1
AI Triple Camera




Shot on vivo S1
AI Triple Camera